शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तक्रार अर्ज क्र. ६१/२०१९

| | | |
|---|---|---|
| श्रीमती शर्मिष्ठा सुभाष कुलकर्णी | } | तक्रारदार |
| विरूध्द् | | |
| १. डेक्कन एज्यूकेशन सोसायटी, पुणे<br>फर्ग्युसन कॉलेज कॅम्पस, पुणे ०४<br>२. विलिंग्डन महाविद्यालय, सांगली,<br>ता. मिरज, जि. सांगली | } | वि. प |

डेक्कन एज्यूकेशन सोसायटी, पुणे या शिक्षण संस्थेचे विलिंग्डन महाविद्यालय, सांगली यांचेकडील शिक्षिका डॉ. शर्मिष्ठा सुभाष कुलकर्णी यांनी दि.१६/०२/२०१९ रोजी तक्रार निवारण समितीकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जात नमूद तक्रार पुढीलप्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

मी, विलिंग्डन कॉलेज, सांगली येथे संख्याशास्त्र विषयाची सहयोगी प्राध्यापक म्हणून काम करीत असून संख्याशास्त्र विषयाची विभागप्रमूख म्हणून दि.०१/०४/२००७ पासून काम करीत आहे. संपूर्ण कालावधीत माझ्याकडून कोणतेही गैरवर्तन घडलेले नाही. कोणतीही चौकशी झालेली नाही. जाणूनबुजून संस्थेच्या किंवा वरिष्ठांच्या आज्ञेचे पालन करणेचे नाकारलेले नाही. तरीही सदर कॉलेजच्या प्राचार्यांनी पूर्णतः बेकायदेशीररित्या दि.०६/०६/२०१८ पासून संख्याशास्त्र विभाग प्रमुख पदाच्या जबाबदारीतून मला मुक्त करण्याचा आदेश दिलेला आहे. सदर आदेश कोणत्याही पुर्वसूचने शिवाय आहे. विभागप्रमूख पदावरून कमी करणेबाबत मा.प्राचार्यांना अधिकार नाहीत. परिणामी सदर आदेश अधिकारबाह्य आहे. सदर आदेश कोणत्याही चौकशी शिवाय दिलेला असल्याने ता रद्द होण्यास पात्र आहे. त्यामुळे संख्याशास्त्र विभाग प्रमुख पदाच्या जबाबदारीतून मुक्त करणारा मा.प्राचार्यांनी दि.०६/०६/२०१८ रोजी दिलेला बेकायदेशीर आदेश त्वरीत रद्द करणेबाबत विनंती.

**संस्था व महाविद्यालयाचा अभिप्राय :**

प्रशासकीय कामकाजासंदर्भात - प्रमुख, संख्याशास्त्र विभाग, विमसां यांची कामकाज पध्दती संस्थेच्या व प्राचार्यांच्या आदेशाची अवहेलना करणारी आढळून आल्यामुळे प्राचार्यांनी त्या संदर्भात उचीत कारवाई करण्यासंदर्भात महाविद्यालय विकास समितीच्या बैठकीपुढे विषय मांडला होता.

१. प्रा.एस.एस.कुलकर्णी यांनी बी.एस्सी. भाग-३ संख्याशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांची सहल दिनांक ०९/०१/२०१८ रोजी महाबळेश्वर येथे नेली होती. सदर सहलीच्या आयोजनामध्ये डेक्कन एज्युकेशन सोसायटीने विहित केलेल्या कोणत्याही सुरक्षा विषयक व आर्थिक नियमाचे पालन केले नाही. ही बाब अंत्यंत गंभीर आहे.

२. जा.क्र. विमसां/२०१७-१८/११९३/ दि. १६/०३/२०१८ अन्वये प्रा. एस.एस. कुलकर्णी यांना शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षांतील बी.एस्सी. भाग १ या वर्गातील ज्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठ परीक्षेचे फॉर्म भरले आहेत अशा सर्व विद्यार्थ्यांची संख्याशास्त्र विषयातील प्रात्यक्षिक परीक्षा दि. २० मार्च, २०१८ पूर्वी घ्यावी, मुलांचे शैक्षणिक नुकसान करू नये असे प्राचार्यांनी आदेश दिले होते. तथापि सौ.कुलकर्णी यांनी त्यासंबंधी जाणूनबुजून कार्यवाही केली नाही व प्राचार्यांच्या आदेशाचा अवमान केला. या प्रकरणी विद्यार्थ्यांचे आंदोलन झाले व महाविद्यालयाची गैरप्रसिध्दी झाली.

त्यांनी संख्या व प्राचार्यांच्या आदेशाचे जाणूनबूजून उल्लंघन केले असल्यामुळे त्यांचेकडील विभाग प्रमुख पदाचा कार्यभार काढून घेण्याचा अधिकार प्राचार्यांना महाविद्यालय विकास समितीच्या ठरावान्वये देण्यात आला होता. त्यास अनुसरून प्राचार्यानी जा.क्र.विमसां/आस्था/२०१८-२०१९/९३३ दि. ०६/०६/२०१८ अन्वये प्रा.एस.एस.कुलकर्णी यांना विभाग प्रमुख पदाच्या जबाबदारीतून मुक्त केले आहे.

तक्रारी संदर्भात केलेल्या पत्रव्यवहाराची माहिती-

१.डॉ.एस.एस.कुलकर्णी, प्रमुख, संख्याशास्त्र विभाग, विमसां यांनी जर्नल सर्टिफाय केले नाही व प्रात्यक्षिक परीक्षेस बसू दिले नाही. या संदर्भातील विद्यार्थ्यांची तक्रार दि.१३/०३/२०१८.

२.विद्यार्थ्यांच्या तक्रारी संदर्भात खुलासा सादर करण्याविषयी डॉ.एस.एस.कुलकर्णी यांना दिलेले पत्र कार्यालयाचे पत्र जा.क्र.विमसां/आस्था/२०१७-२०१८/११७७ दि. १३/०३/२०१८.

३.डॉ.एस.एस.कुलकर्णी, प्रमुख, संख्याशास्त्र विभाग, विमसां यांनी जर्नल सर्टिफाय केले नाही व प्रात्यक्षिक परीक्षेस बसू दिले नाही, त्यांचे वागणे हेकेखोर व अहंकारी पणाचे असल्याबाबत विद्यार्थ्यांची तक्रार (स्मरणपत्र क्र. १) दि. १६/०३/२०१८.

४.संख्याशास्त्र विभागातील परीक्षा फॉर्म भरलेल्या विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक परीक्षा दि. २०/०३/२०१८ पुर्वी घेणेबाबत डॉ. कुलकर्णी, प्रमुख, संख्याशास्त्र विभाग, विमसां यांना दिलेला कार्यालयीन आदेश जा.क्र विमसां/२०१७-२०१८/११९३ दि. १६/०३/२०१८.

५.दि. १६/०३/२०१८ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने डॉ. एस. एस. कुलकर्णी यांनी केलेला दिशाभूल करणारा, अपूर्ण व मोघम खुलासा दि. २०/०३/२०१८.

६.खुलासा अग्राह्य स्वरूपाचा असल्याबाबत व संबंधित ९ (नऊ) विद्यार्थ्यांची परीक्षा दि. २८/०३/२०१८ पूर्वी घेण्याबाबत डॉ. कुलकर्णी यांना पुन्हा दिलेला आदेश जा.क्र. विमसां/२०१७-२०१८/१२१६ दि. २२ दि.२२/०३/२०१८.

७.संबंधित विद्यार्थ्यांची तक्रार योग्यरित्या हाताळली नसल्याबाबत, असामंजस्याची भूमिका घेत असल्याबाबत, हेकेखोर व अडवणूकीच्या भूमिकेमुळे महाविद्यालाची व संस्थेची प्रतिमा मलीन होत असल्याने कारवाई का करू नये याबाबत खुलासा करण्याबाबत डॉ. कुलकर्णी यांना दिलेले पत्र जा.क्र. विमसां/२०१७-२०१८/१२१७ दि. २२/०३/२०१८.

८.विद्यार्थ्यांच्या प्रश्नाविषयी असंवेदनशिलता, हेकेखोरपणा, असंजसपणा दर्शविणारा डॉ.कुलकर्णी, प्रमुख, संख्याशास्त्र विभाग यांचा खुलासा दि.२६/०३/२०१८.

९.शहर व नागरिक विकास मंच याचेकडून संख्याशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांच्या न्याय प्रश्नी अंदोलनाचा इशारा देणारे पत्र दि.०२/०४/२०१८.

१०. प्रमुख, संख्याशास्त्र विभाग विमसां या मानसिक छळ करीत असल्याबाबत विद्यार्थी सौरभ बामणे याचे पत्र दि.०३/०४/२०१८.

११.शैक्षणिक सहल नेताना संस्थेच्या सुरक्षा विषयक व अर्थविषयक नियमांचे पालन न केल्याबाबत खुलासा करण्याविषयी व दि.१६/०३/२०१८ रोजीच्या आदेशाप्रमाणे विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक परिक्षा घेतली नाही व वरिष्ठांच्या आज्ञेचे उल्लंघन केल्यामुळे विभाग प्रमुख पद का काढून घेवू नये याबाबत खुलासा करण्याविषयी डॉ.एस.एस.कुलकर्णी यांना दिलेले पत्र दि.१८/०५/२०१८

१२.दि.१८/०५/२०१८ रोजीच्या पत्रातील मुद्यांना बगल देणारा व महिला प्राध्यापक म्हणून अन्याय होत असल्याबाबत कांगावा करणारा अग्राहृय खुलासा दि.२८/०५/२०१८

१३.महाविद्यालय विकास समिती ठराव क्र.५ दि.१४/०५/२०१८ चा प्रा.एस.एस.कुलकर्णी यांचे विभाग प्रमुख पद काढून घेण्याचे अधिकार मा.प्राचार्य, विमसां यांना देण्यात येत असलेबाबत ठराव.

**समितीची निरिक्षणे :**

प्रस्तुतची तक्रार तक्रारदाराने जाबदार संस्थेने कोणतीही चौकशी न करता पूर्णतः बेकायदेशीररित्या दि.०६/०६/२०१८ या तारखे पासून संख्याशास्त्र विभाग प्रमुख पदाच्या जबाबदारीतून त्यांना मुक्त करण्याचा आदेश दिलेला आहे. तो अधिकार प्राचार्यांना नाही आणि सदरचा आदेश कोणत्याही चौकशीविना दिलेला नसल्यामुळे तो बेकायदेशीर असून रद्द होण्यास पात्र आहे. सबब तो बेकायदेशीर आदेश रद्द करण्यात यावा अशी तक्रार नोंदविलेली आहे.

संस्थेचे म्हणणे असे आहे की, तक्रारदारांचे विभाग प्रमुख म्हणून करण्यात आलेले कामकाज, संस्थेच्या व प्राचार्यांच्या आदेशांचे भंग करणारे होते. सबब प्राचार्यांनी तक्रारदाराविरुध्द् उचित कारवाई करण्यासंदर्भात महाविद्यालय विकास समितीच्या बैठकीपुढे विषय मांडलेला होता व तक्रारदारा विरुध्द्च्या तक्रारीचा व त्याच्या सेवेतील त्रुटीचा विचार करुन सदर महाविद्यालय विकास समितीने तक्रारदाराकडील विभाग प्रमुख पदाचा कार्यभार काढून घेण्याचा अधिकार प्राचार्यांना ठरावानुसार दिलेला होता व त्या ठरावास अनुसरुन जा.क्र.विमसां/आस्था/२०१८-१९/९३३, दि.०६/०६/२०१८ च्या आदेशान्वये विभाग प्रमुख पदाच्या जबाबदारीतून मुक्त केलेले आहे. यासंदर्भात तक्रारदाराशी केलेल्या पत्रव्यवहाराची जंत्री आपल्या निवेदनात दिलेली आहे. तसेच तक्रारदाराविरुध्द् असणा-या आरोपाचे विवेचनादाखल लेखी म्हणणे दिलेले आहे. परंतु त्या आरोपांचा पुनर्विचार ही समिती करु इच्छित नाही. सबब तक्रारदाराविरुध्द् केलेली कारवाई उचित व कायदेशीर असून प्रस्तुतची तक्रार चालण्यास पात्र नाही. सबब तक्रार खारीज करण्यात यावी असे म्हणणे मांडण्यात आले आहे.

आज रोजी तक्रारदार व्यक्तीशः आणि जाबदार संस्थेतर्फे महाविद्यालयाचे प्राचार्य हजर होते. उभयतः त्यांचा युक्तीवाद समितीने ऐकुण घेतला. शिवाजी विद्यापीठाचे प्रचलित परिनियम जे महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ च्या कलम ५१ खाली निर्गमित करण्यात आले आहेत त्यातील अभ्यास मंडळाशी संबंधित परिनियम ३९७ चे अवलोकन करता असे दिसून येते की, प्रत्येक महाविद्यालयाच्या प्राचार्यांना पूर्णवेळ शिक्षकामधून प्रत्येक विभागाच्या विभाग प्रमुखपदी ज्याची दहा वर्षापेक्षा जास्त सेवा झालेली असेल त्यास विभाग प्रमुखपदी नेमणुक करण्याचा अधिकार दिलेले आहेत. त्या कलमाचा विचार करता हे स्पष्ट होते की, विभाग प्रमुख पदी कोणाला नेमावयाचे, कोणाला ठेवावयाचे, कोणाकडून कार्यभार काढून घ्यावयाचा याचे स्वेच्छाधिकार प्राचार्यांना दिलेले आहेत.

प्रस्तुत प्रकरणातील कागदपत्रांचा विचार करता हे स्पष्ट होते की, तक्रारदाराविरुध्द् असणा-या काही तक्रारीबद्दल आणि त्यांच्या सेवेतील काही त्रुटीमुळे महाविद्यालय विकास मंडळाने सनदशीर ठराव

पास करुन प्राचार्यांना प्रस्तुत तक्रारदारांना विभाग प्रमुख पदावरुन हटविण्याकरिता सर्व अधिकार दिलेले होते. दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते की, तक्रारदाराविरुध्द् असलेल्या आरोपांबद्दल त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिलेली होती व तो खुलासा समाधानकारक नव्हता, सबब तो मान्य करण्यात आला नव्हता.

वर नमुद केल्याप्रमाणे प्राचार्याना विभाग प्रमुख पदी नेमावयाचे किंवा त्यांची नेमणुक रद्द करण्याचे स्वेच्छाधिकार दिलेले आहेत. प्रस्तुत प्रकरणी ते अधिकार प्राचार्यांना योग्य ती कायदेशीर प्रक्रिया राबवून पारीत केल्याचे दिसते. तसेच नैसर्गिक न्याय तत्वाचे पालन झाल्याचे देखील दिसते. त्यामुळे तो आदेश कोणत्याही अंगाने बेकायदेशीर असल्याचे या समितीस दिसून येत नाही. सबब तक्रारदाराची तक्रार ही अयोग्य आहे, असे या समितीचे मत झालेले आहे. सबब ही समिती खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

**आदेश**

प्रस्तुतची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविणेत यावे.

**दिनांक :** 02 MAY 2023

शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

**सदस्य**
**(डॉ.व्ही.एन.शिंदे)**

**सदस्य**
**(डॉ.एस.एस.महाजन)**

**सदस्य**
**( डॉ.एस.पी.हंगिरगेकर )**

**सदस्य**
**(श्री.एस.यु.शिंदे)**

**सदस्य सचिव**
**(श्रीमती ए.ए.कदम)**

**सदस्य**
**(डॉ. ए.एच.कोळेकर )**

**अध्यक्ष**
**(श्री.ए.व्ही.देशपांडे)**